# कोरोनाच्या पार्श्वभूमीवर परीक्षेला बसण्यासाठी संधी देणेबाबत..

सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०२१/ प्र.क्र.६१/ कार्या १२, दिनांक १७ डिसेंबर, २०२१ अन्वये कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासकीय सेवेत सरळसेवेने नियुक्ती संदर्भात जाहिराती प्रसिद्ध झाल्या नसल्याने, या कालावधीत काही उमेदवारांची कमाल वयोमर्यादा ओलांडली गेली असल्याने, त्यांची परीक्षेस बसण्याची संधी हुकली आहे, अशा उमेदवारांना स्पर्धा परीक्षांना बसण्यासाठी संधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात तरतुद केली आहे.

त्यानुसार, ज्या उमेदवारांनी त्यांचे संवर्गास विहीत केलेली कमाल वयोमर्यादा दिनांक ०१ मार्च, २०२० ते दिनांक १७ डिसेंबर, २०२१ या कालावधीत ओलांडली असेल अशा उमेदवारांना भूमि अभिलेख विभागाकडील भूकरमापक तथा लिपीक या पदाकरीता **"एक वेळची विशेष बाब"** म्हणून परीक्षेस बसण्याची संधी देण्यात येत आहे.

सदर सवलत उक्त शासन निर्णयात नमुद तरतुदींनुसार केवळ कमाल वयोमर्यादेच्या बाबतीत असेल. उमेदवारास दिनांक ०९/१२/२०२१ रोजी संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या जाहीरातीत नमुद इतर अर्हता पूर्ण करणे आवश्यक आहे.